महाराष्ट्र पोलीस

# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र



०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in

जा.क्र. जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र/ ५२३/पोलीस अधिक्षक कार्यालय भंडारा, दिनांकः- २७/०९/२०१८

## विवीध गुन्हयात दोषसिध्दी झाल्याने आरोपींना द्रव्यदंड व कारावासाची शिक्षा

**पोलीस स्टेशन पवनी अंतर्गत** :– दिनांक **२५/०९/२०१८ रोजी** अपराध कमांक ३०८७/२०१६ कलम २९४,५०४,५०६ भांदवि. मधील फिर्यादी नामे श्रीमती सरीता रामलाल जांभुळकर वय ३५ वर्ष, रा. रामपुरी वार्ड पवनी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन वरील कलमान्वये गुन्हा दाखल केला. व सदर गुन्हयाचा तपास पोलीस निरीक्षक चकाटे यांचे मार्गदर्शनात पोलीस नाईक अनिल कळपते, पोलीस हवालदार सुभाष मस्के यांच्या मदतीने गुन्हयाचा कसोटीने तपास करुन आरोपी नामे नानाजी उर्फ ज्ञानेश्वर दाजीबा लिचडे वय ५२ वर्ष रा. रामपुरी वार्ड पवनी याने केलेल्या गुन्हयात दोष सिध्द झाल्याने **सदर गुन्हयाचा निकाल श्री. मा. यादव साहेब प्रथम श्रेणी न्यायालय दंडाधिकारी सा. कोर्ट पवनी यांनी** दिनांक **२५/०९/२०१८ रोजी दिला असुन** आरोपीस १ महिना साधा कारावास व **३०००/–रुपये दंड(दंड न भरल्यास १० दिवस साधा कारावास) अशी शिक्षा ठोठावली आहे. त्यामध्ये बि. जी. दामले सरकारी वकील यांनी फिर्यादी तर्फे आरोपीतांनविरुध्द बाजु मांडून आरोपीस शिक्षा होण्यास मोलाची कामगिरी केली आहे. तसेच सदर गुन्हयात तपासी अधिकारी पो. ना. अनिल कळपते, कोर्ट मोहरर पैरवी अधिकारी म्हणुन पो. शि. गोविंद गुट्टे यांनी कामकाज पाहीले आहे.**

**पोलीस स्टेशन तुमसर व आंधळगाव अंतर्गत येथे वाहतुकीस अडथळा निर्माण केल्याने दाखल गुन्हयात** :– दिनांक **२५/०९/२०१८** रोजी मा. जेएमएफसी कोर्ट तुमसर येथील खालील येथील केस मधील गुन्हयात दोष सिध्द झाल्याने त्यापैकी १)अप क्र. ४६३/१८ कलम २८३ भादवी मधील आरोपी नामे मिथुन महादेव नागदेवे रा. रुपेरा, आरोपीस २००/–रु. दंड न भरल्यास २ दिवसाचा साधा कारावास, २) अप क्र. ४४३/१८ कलम २८३ भादवी मधील आरोपी नामे अरविंद दुर्वाजी गजभिये रा. देव्हाडी, आरोपीस २००/–रु. दंड न भरल्यास २ दिवसाचा साधा कारावास, ३)अप क्र. ४६५/१८ कलम २८३ भादवी मधील आरोपी नामे पंकज राजकुमार खोब्रागडे रा. नागपुर, आरोपीस २००/–रु. दंड व दंड न भरल्यास २० दिवसाचा साधा कारावास, ४) अप क्र. ४५९/१८ कलम २८३ भादवी मधील आरोपी नामे कोमल श्रीकृष्ण रेवतकर रा. माकडे वार्ड रा. तुमसर आरोपीस २००/–रु. दंड न भरल्यास २

दिवसाचा साधा कारावास, ५) अप क्र. ४४८/१८ कलम २८३ भादवी मधील आरोपी नामे सलमान मतीनखॉन पठान रा. कुंभारे वार्ड तुमसर आरोपीस २००/—रु. दंड न भरल्यास २ दिवसाचा साधा कारावास, ६) अप क्र. ४६७/१८ कलम २८३ भादवी मधील आरोपी नामे तुषार विनोद बन्सोड रा. सिहोरा, आरोपीस २००/—रु. दंड न भरल्यास २ दिवसाचा साधा कारावास, यांनी सार्वजनिक रोडवर येणा—या जाणा—या लोकांना अडथळा निर्माण केल्याने शिक्षा ठोठावली आहे.

तसेच ७) मा. जेएमएफसी कोर्ट दुसरे मोहाडी यांनी अप क्र. १२६/१८ कलम २८३ भादवी मधील आरोपी नामे विनोद गौरीशंकर झंझाड रा. टाकला यास २००/—रु. दंड न भरल्यास २ दिवसाचा साधा कारावास दिलेला आहे.

**पोलीस स्टेशन तुमसर अंतर्गत** :— दिनांक **२६/०९/२०१८** रोजी मा. **प्रथम श्रेणी न्यायालय** तुमसर मधील २८३ गुन्हयात दोष सिध्द झाल्याने १) अप क्रमांक ४६९/१८ कलम २८३ भांदवि. मधील आरोपी नामे धर्मपाल चैतु रोडगे रा. आंबेडकर वार्ड तुमसर यांनी आरोपीस २०० दंड व दंड न भरल्यास २ दिवस साधा कारावास.

**२) अप क्रमांक ४५८/१८ कलम २८३ भांदवि. आरोपी नामे सखीउद्दीन जमाउद्दीन कुरेशी रां. देव्हाडी** त्याला २०० दंड व दंड न भरल्यास २ दिवस साधा कारावास **मा. प्रथम श्रेणी न्यायालय** तुमसर यांनी शिक्षा दिली आहे. जेएमएफसी कोर्ट दुसरे मोहाडी यांनी ३)अप क्रमांक १३७/१८ मधील कलम २८३ भांदवि मधील प्रभाकर लहू आगाशे रा. रोहा याला २०० दंड व दंड न भरल्यास २ दिवस साधा कारावास.

**वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही अश्या रितीने रस्त्यावर वाहणे उभे ठेवणार नाही असे पोलीस दलातर्फे जनतेस आवाहन आहे.**

(जितेद्रं के आडोळे)
पोलीस उपनिरीक्षक
जनसंपर्क अधिकारी
संपर्क क्र. ९४०३१०९७२०

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.